TOYO ENGINEERING

# आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण, गुणवत्ता आणि सूचना संरक्षण संबंधित मूलभूत धोरणे

टोयो इंजीनियरिंग इंडिया प्राइवेट लिमिटेड (यापुढे टोयो-आय म्हणून संबोधित) विश्वास ठेवते की, न केवळ उचित आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण, गुणवत्ता, सूचना संरक्षण, वैयक्तिक माहितीची गोपनीयता तसेच बचावात्मक कायदे आणि नियमांचे पालन करणे, शिवाय याच्याशी जोडलेल्या आमच्या ग्राहक आणि समाजाकडून अपेक्षित असलेल्या गरजा पूर्ण करणे, व्यावसायिक उपक्रमांचे आचरण आणि आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडणे अत्यावश्यक आहे आणि आम्ही खालील मूलभूत धोरणांचे पालन करू:

१. आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण (हेल्थ, सेफ्टी एंड एनवायरनमेंट)

- अ) "सुरक्षा इतर सर्व बाबींवर अग्रक्रम करते" या गोष्टची सतत पुष्टि तसेच एकमताने ते सामायिक करणे आणि व्यावसायिक प्रवासांसह सर्व कार्यास्थानी सुरक्षित आणि निरोगी परिस्थिती समजून घेणे शिवाय ती राखणे.
- आ) धोके दूर करण्यासाठी सर्व शक्य वास्तववादी पावले उचलून तसेच आरोग्य, सुरक्षा और पर्यावरणचे प्रतिबंधात्मक उपाय लागू करुन आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरणाची जोखिम कमी करुन, सर्व कार्यांना कोणतीही दुर्घटना न होता, शिवाय लोकांना कोणतीही हानी न करता, सर्व कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे.
- इ) आमच्या कर्मचार्यांना आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरणाच्या संबंधित बाबींमध्ये सल्लामसलत आणि सहभागा मध्ये प्रोत्साहन देऊन कार्याचे असे वातावरण आणि संधीं प्रदान करण्याचा प्रयत्न करणे जेणेकरून ते त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य राखू शकतील आणि सुधारू शकतील.
- ई) व्यावसायिक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी साठी धोके आणि जोखिमे विरुद्ध योग्य सुरक्षा उपाय करणे.
- उ) संसाधने आणि उर्जेची बचत करून, कचरा विषमुक्त, कमी आणि पुनः चक्रण करून, तसेच आमच्या कार्य उपक्रमा दरम्यान प्रदूषण रोखून, पर्यावरणीय प्रदूषणाचा भार कमी करणे.
- ऊ) आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण प्रक्रियांद्वारे त्यांची वचनबद्धता ओळखणे तसेच त्यांचे पालन करणे. टोयो-आय मध्ये आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरणाचे पालन करणे बंधनकारक आहे आणि ही लाइन व्यवस्थापनची जबाबदारी शिवाय रोजगाराची अट आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रकारे परिस्थिती असुरक्षित वाटत असल्यास काम थांबवण्याचा अधिकार आहे.

२. गुणवत्ता (क़्वालिटी)

- अ) आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण लक्षात घेऊन, उच्च दर्जाची उत्पादने आणि सेवा प्रदान करणे तसेच आमच्या ग्राहकांना आणि समाजाकडून अपेक्षित असलेल्या गरजा पूर्ण करणे.
- आ) टोयो नियमांचे पालन करणे आणि आमच्या उच्च-तंत्र अनुप्रयोग क्षमता आणि अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करणे.
- इ) आमची उत्पादने आणि सेवांमध्ये शून्य दोष प्राप्त करणे.

३. सूचना संरक्षण (इनफार्मेशन सिक्योरिटी)

- अ) टोयो-आयच्या मालकीची आणि नियंत्रित सूचनेच्या मालमत्तेची गोपनीयता राखणे, त्यांचा नाश किंवा बदल टाळणे आणि मागणीनुसार त्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे.
- आ) सूचना संरक्षण, सायबर संरक्षण आणि गोपनीयता उल्लंघन घटनांना प्रतिबंध करणे, आणि एखादी घटना घडल्यास त्याचे कारण तपासणे आणि सुधारात्मक कृती अंमलात आणणे.
- इ) व्यवसाय सातत्य राखण्यासाठी आवश्यक सूचना संरक्षण नियंत्रण योजना आणि उपायांची स्थापना करणे आणि ती राखणे.

४. व्यवस्थापन प्रणालीची प्रभावशीलता स्थापित करण्यासाठी आणि सतत सुधारण्यासाठी, जोखीम आधारित विचारांना चालना देणे यासह उद्दिष्ट निर्धारण, धोक्याची ओळख, जोखीमीचे मुल्यमापन, प्रतिकारक उपायांचे निर्धारण, कार्यप्रदर्शन नियंत्रण, पुनरावलोकन आणि देखरेख, शिक्षण, प्रशिक्षण देणे शिवाय व्यवसायात सातत्य राखण्यासाठी, व्यवस्थापनाच्या ठाम विश्वासनुसार, कर्मचारी सहभागाद्वारे आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण, गुणवत्ता आणि सूचना संरक्षण सुनिश्चित करणे ही एक पूर्वापेक्षा आहे.

५. जागरूकता आणि प्रशिक्षणाद्वारे आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण, गुणवत्ता, सूचना संरक्षण, गोपनीयता आणि वैयक्तिक माहितीच्या बचावासाठी सर्व कर्मचाऱ्यांच्या मानसिकते मध्ये सतत सुधार करणे.

ही धोरणे कोणत्याही क्षेत्रात किंवा देशात कार्यरत असलेल्या सर्व टोयो-आय कर्मचाऱ्यांना लागू होईल. टोयो-आय ही धोरणे आपल्या ग्राहक, परवानाधारक, व्यावसायिक भागीदार तसेच इतर संबंधित पक्षांना ही धोरणे सामायिक करून ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहकार्य करेल.

川原 崇 **२३ डिसेंबर २०२४**

**ताकाशी कवहारा**
**व्यवस्थापकीय संचालक**
**टोयो इंजीनियरिंग इंडिया प्राइवेट लिमिटेड**